-45-
-33-

**शासकीय कर्मचाऱ्यांने सेवा निवृत्तीच्या वेळी स्थायी पद/स्थायित्व प्रमाणपत्र धारण केलेले असण्यासंबंधीची अट...**

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक: सेनिवे १००१/३३८/सेवा-४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दिनांक: २ जून २००३

## निर्णय

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम-३० च्या तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्याची अर्हताकारी सेवा, त्याची ज्या पदावर कायमपणे किंवा स्थानापन्न किंवा तात्पुरती या नात्याने प्रथमत: नेमणूक केलेली असेल, त्या पदाचा कार्यभार तो ज्या तारखेस घेईल त्या तारखेपासून सुरु होईल. मात्र सेवानिवृत्तीच्या वेळी सदरहू शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय सेवेतील एखादे स्थायी पद कायमपणे धारण केलेले असले पाहिजे अथवा निलंबित धारणाधिकार किंवा स्थायित्व प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.

२. शासन आता असा निदेश देत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम-३० मधील, <u>"सेवानिवृत्तीच्या वेळी शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय सेवेतील एखादे स्थायी पद कायमपणे धारण केलेले असले पाहिजे अथवा निलंबित धारणाधिकार किंवा स्थायित्व प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे"- ही तरतूद वगळण्यात येत आहे.</u>

३. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील व या दिनांकाला जे शासकीय कर्मचारी सेवेत आहेत/होते त्यांना लागू होतील.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ३० च्या विद्यमान तरतूदी, या शासन निर्णयातील तरतूदींच्या मर्यादेपर्यन्त सुधारण्यात आल्या आहेत असे मानण्यात येईल. या नियमात रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

२४९८०-९
जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
9 जुलाई JUL 2003

अ.कु.दी. जाधव
शासनाचे प्रधान सचिव